# GONDWANA UNIVERSITY, GADCHIROLI

(Established by Government of Maharashtra Notification No. MISC -2007/(322/07) UNI -4 Dated 27th Sept. 2011 State University Governed by Maharashtra University Act, 1994 )

## Office of the Director Students' Welfare

**Dr.I.S. Mohurley**
**Director**
Mobile: 7774027661, 9422893555

MIDC Road, Complex, GADCHIROLI – 442 605 (M.S)
web: unigug.org/ gondwana.digitaluniversity.ac
**Email :** director.studentwelfaregug@ gmail.com


**पत्र क्र. No.GU/DSW/118/2015** **Dt:15/09/2015**

प्रति,

१) मा. प्राचार्य,
संलग्नित सर्व महाविद्यालये,
२) मा. विभागप्रमूख पदव्युत्तर शैक्षणिक विभाग,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

**विषयः "De-redicalisation of youths and preserving communal amity" बाबत.**

**संदर्भः पत्र क्र. संकीर्ण २०१५/प्र.क्र. ४८८/विशि—३ उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई—४०००३२ दि. २५ ऑगस्ट, २०१५**

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भांकित विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली **"De-redicalisation of youths and preserving communal amity" बाबत** दि. ०३/०३/२०१५ रोजी बैठक आयोजित केली होती. बैठकीच्या इतिवृत्तांची प्रत अवलोकनार्थ सोबत जोडली आहे. इतिवृत्तानुसार अल्पसंख्याक समाजातील तरूणाचे उदात्तीकरण टाळण्यासाठी त्याबाबतचे धोके समजावून त्यांच्यामध्ये जनजागृती करण्याबाबत आवश्यक त्या उपाययोजना महाविद्यालय स्तरावर कराव्या व कार्यवाही अहवाल शासनाकडे सादर करण्यासाठी संचालक विद्यार्थी कल्याण, गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली यांचे कार्यालयास पाठवावा, ही विनंती.

आपला

(डॉ. ईश्वर श्रा. मोहुर्ले)
संचालक विद्यार्थी कल्याण
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

विद्यार्थी कल्याण विभाग
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**सहपत्रे:— वरीलप्रमाणे**

**प्रत माहितीस्तव :—**

**१) मा. कुलगुरु, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली**

**२) मा. कुलसचिव, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली**

महाराष्ट्र शासन

क्र.संकीर्ण २०१५/प्र.क्र. ४८८/विशि-३
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक २५ ऑगस्ट, २०१५.

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
महाविद्यालयीन विभाग
आवक क्र. 2298 दिनांक 2/9/15
जावक क्र. 1296 दिनांक 3/9/15

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
महाविद्यालयीन विभाग
आवक क्र. 2260 दिनांक 3/9/15
जावक क्र. 1364 दिनांक 9/9/15

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
विद्या विभाग
आवक क्र. 342 दि. 3/9/15
जावक क्र. 383 दि. 3/09/15

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
कुलसचिवांचे कार्यालय
आवक क्र. ...... दि. ......
जावक क्र. 832 दि. 2/9/15

प्रति,

कुलसचिव,
सर्व अकृषी विद्यापीठे

संचालक,
उच्च शिक्षण विभाग,
मुंबई.

**विषय** :- "De-redicallsation of youths and preserving communal amity" बाबत.

संदर्भ :- शासनाचे पत्र क्र. बैठक – २४११/प्र.क्र. ६५/१५/समन्वय, दि. १०/०८/२०१५ चे पत्र.

महोदय,

उपरोक्त विषयावरील संदर्भिय पत्राची प्रत सोबत जोडली आहे.

२. मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली "De-redicallsation of youths and preserving communal amity" बाबत दि. ०३/०३/२०१५ रोजी बैठक आयोजित केली होती. सदर बैठकीच्या इतिवृत्तानुसार, आपल्या अधिपत्याखालील सर्व शैक्षणिक संस्था व महाविद्यालये यांना अल्पसंख्यांक समाजातील तरुणांचे उदात्तीकरण टाळण्यासाठी त्याबाबतचे धोके समजावून त्यांच्यामध्ये जनजागृती करण्याबाबत आवश्यक त्या उपाययोजना करण्याबाबत योग्य त्या सूचना देण्यात याव्यात, ही विनंती. A

आपली,

(स्नेहा न. जोशी)
कक्ष अधिकारी

A प्रमाणे महाविद्यालयीन विभागाने उपनिर्देश द्यावेत. इतीत अग्रेषित.

महाविद्यालयीन विभाग;

श्री Nagarle कार्यवाही करावी.
9/9/15

http//: gen. let/pg.471

**<u>महाराष्ट्र शासन</u>**

तात्काळ

क्र.बैठक -२४११ /(प्र.क्र.६५/१५) /समन्वय
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय, मुंबई — ४०० ०३२.
दिनांक :- २० मे २०१५.

प्रति,

सर्व सह सचिव/अवर सचिव
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय, मुंबई-३२

विषय :- De-radicalisation of youths and preserving communal amity.
मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखालील बैठक.

महोदय,

उपरोक्त विषयावरील गृह विभागाचे पत्र क्र.डिआयएस-०३१५/प्र.क्र.८१/वि.शा.१ब, दि.३०.४.२०१५ व दि.६.५.२०१५ चे पत्र सहपत्रासह कृपया पहावे. (प्रत सोबत जोडली आहे)

२. उपरोक्त विषयाबाबत चर्चा करण्यासाठी मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दि.३.३.२०१५ रोजी झालेल्या बैठकीचे कार्यवृत्त वरील दि.३०.४.२०१५ च्या पत्रा सोबत प्राप्त झाले आहे. कार्यवृत्तातील विषय क्र.६, ८, १३, १४, १७ मधील आपल्या उपविभागाशी संबंधित मुद्यांबाबत योग्य ती कार्यवाही विहित कालावधीत करुन, एकत्रित कार्यपूर्ती अहवाल समन्वय कार्यासनास उपलबध करुन द्यावा. सदर अहवाल गृह विभागास पाठवावयाचा असल्याने, आपला अहवाल विहित कालावधीत उपलबध करुन द्यावा, ही विनंती.

आपली विश्वासू,

सहपत्र : वरील प्रमाणे.

( का.रा.पिळणकर)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.

क्र.डिआयएस ०३१५/प्र.क्र.८१/वि.शा.१ द
गृह विभाग, सेंटर १, ७ वा मजला,
जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई - ५
दिनांक :- ३०.०४.२०१५

प्रति,

१. अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव (सव मंत्रालयीन विभाग) मंत्रालय, मुंबई.
२. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३. अपर पोलीस महासंचालक, दहशतवाद विरोधी पथक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
४. पोलीस आयुक्त,बृहन्मुंबई.
५. आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
६. सर्व जिल्हाधिकारी.
७. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.

विषय :- Re-radicalisation of youths and preserving communal amity.
मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली बैठक.

महोदय,

उपरोक्त विषयाबाबत चर्चा करण्यासाठी मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०३.०३.२०१५ रोजी सकाळी १०.०० वा. मा.मुख्यमंत्री महोदयांचे समिती कक्ष, सहावा मजला, मंत्रालय, मुंबई येथे बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीचे बैठकीचे कार्यवृत्त सोबत जोडले आहे. कार्यवृत्तातील आपल्याशी संबंधित मुद्यांबाबत योग्य ती कार्यवाही विहित कालावधीत करुन कार्यपूर्ती अहवाल शासनास सादर करावा, ही विनंती.

आपला,

(जयत भोईर)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

सहपत्र :- वरीलप्रमाण.

प्रत माहितीसाठी तथा आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित
मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
अपर मुख्य सचिव (गृह) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव (विशेष) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
उप सचिव (श्री.सोवितकर), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई

विषय :- De-radicalisation of youths and preserving communal amity या विषयाबाबत चर्चा करण्यासाठी मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली सोमवार दिनांक ०३.०३.२०१५ रोजी सकाळी १०.०० वा. आयोजित करण्यात आलेल्या बैठकीचे कार्यवृत्त.

De-radicalisation of youths and preserving communal amity या विषयाबाबत चर्चा करण्यासाठी मा.मुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखाली सोमवार दिनांक ०३.०३.२०१५ रोजी सकाळी १०.०० वा. मा.मुख्यमंत्री महोदय यांचे समिती कक्ष, सहावा मजला, मंत्रालय, मुंबई येथे बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये उपरोक्त विषयाबाबत पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी सादरीकरण केले. त्याअनुषंगाने शासनाने करावयाच्या उपाययोजनांबाबत चर्चा होऊन मा.मुख्यमंत्री महोदयांनी खालीलप्रमाणे निर्देश दिले :-

| अ. क्र. | विषय | मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिलेले निर्देश | कार्यवाही करणारा विभाग | कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. | अल्पसंख्यांकांसाठी योजनांबाबत प्रत्येक विभागाने आराखडा तयार करणे. | अल्पसंख्यांकांसाठी विविध योजना राज्य शासनामार्फत राबविण्यात येत आहेत. त्यासंदर्भात प्रत्येक विभागाने अंमलबजावणीबाबत निश्चित आराखडा तयार करावा व दरवर्षी किमान एक प्रकल्प कार्यान्वित होईल याबाबत उचित कार्यवाही करावी. यावर्षी प्राधान्याने एक प्रकल्प / योजना सुरु करुन यशस्वी करावा. यासंदर्भात अल्पसंख्यांक विकास विभागाने सर्व विभागांशी समन्वय साधून करण्यात येत असलेल्या कार्यवाहीबाबत / सद्यःस्थितीबाबत आढावा घेऊन | नगर विकास विभाग, शालेय शिक्षण विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग, गृहनिर्माण विभाग, उद्योग विभाग, माहिती व तंत्रज्ञान | १ महिना |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | दर महिन्याला मा.मुख्यमंत्री महोदयांना अहवाल सादर करावा. | विभाग, अल्पसंख्यांक विकास विभाग, महसूल व वन विभाग, ग्राम विकास विभाग. | |
| २. | शालेय अभ्यासक्रमात धार्मिक ग्रंथांचा समावेश करण्याबाबत. | अल्पसंख्यांक समाजातील धार्मिक नेत्यांच्या सहभागाने धार्मिक बाबींची योग्य व खरी माहिती जनतेपर्यंत पोहोचविण्याचा कार्यक्रम हाती घेण्यात यावा. धार्मिक शिक्षकांचा गट तयार करुन त्यायोगे धर्मातील सकारात्मक बाबी जनतेसमोर आणाव्यात. अल्पसंख्यांक समाज व इतर समाजामध्ये परस्पर विश्वास शैक्षणिक पद्धती निर्माण करण्याकरिता शालेय अभ्यासक्रमात सर्व धार्मिक ग्रंथांचा समावेश करावा. | अल्पसंख्यांक विकास विभाग, शालेय शिक्षण विभाग | १ महिना |
| ३. | अल्पसंख्यांक बहुल क्षेत्रात नागरी सुविधा पुरविण्याबाबत. | अल्पसंख्यांकबहुल क्षेत्रामध्ये नागरी सुविधांचा मोठ्या प्रमाणावर अभाव आढळून येत आहे. त्याअनुषंगाने सर्व विभागांनी अल्पसंख्यांकबहुल क्षेत्रामध्ये प्राधान्याने नागरी सुविधांची कामे पूर्ण करावीत. तसेच पाणी पुरवठा नियमितपणे केला जाईल याबाबत दक्षता घ्यावी. | नगर विकास विभाग, ग्राम विकास विभाग | १ महिना |
| ४. | मालेगाव रुग्णालयास मनुष्यबळ उपलब्ध | मालेगाव येथील रुग्णालयामध्ये अधिकारी व कर्मचारी यांची संख्या अपुरी असल्यामुळे | सामान्य प्रशासन विभाग, | १ महिना |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | करुन देण्याबाबत. | रुग्णांना वेळच्यावेळी उपचार मिळण्यास गैरसोय होत आहे. त्यामुळे सदर रुग्णालयास तात्काळ मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्यात यावे. | वित्त विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग. | |
| ५. | अल्पसंख्यांक विकास विभागाची वेबसाईट अधिक विकसित करण्याबाबत. | अल्पसंख्यांक समाजामध्ये शासनाप्रती दृढ विश्वास निर्माण करण्याकरिता व शासनाच्या विविध योजनांची माहिती प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी अल्पसंख्यांक विकास विभागाची वेबसाईट अधिक विकसीत करण्यात यावी. | अल्पसंख्यांक विकास विभाग. | १ महिना |
| ६. | Uniform Curriculam तयार करण्याबाबत. | अल्पसंख्यांक समाजातील ज्येष्ठ, बुद्धीवादी व विद्यापिठातील नामांकित प्राध्यापक, उच्च शिक्षित व विद्वान तरुण यांची समिती करुन मदरशांकरिता Uniform Curriculam तयार करण्यात यावे. | अल्पसंख्यांक विकास विभाग, उच्च व तंत्र शिक्षण विभाग. | १ महिना |
| ७. | अल्पसंख्यांक समाजाकरिता म्हाडासारख्या संस्थांमार्फत गृहनिर्माण योजना राबविणे. | शासनातर्फे म्हाडा सारख्या संस्थांकडून एकात्मिक गृह निर्माण योजना अल्पसंख्यांक समाजाकरिता राबविण्यात यावी. | गृह निर्माण विभाग. | |
| ८. | कौशल्य विकास | अल्पसंख्यांक समाजातील तरुणांना कौशल्य विकासाचे प्रशिक्षण मोठ्या प्रमाणावर देण्याबाबत योग्य ती कार्यवाही करावी. | उच्च व तंत्रशिक्षण विभाग. | १ महिना |
| ९. | परस्पर विश्वास वाढविणे. | अल्पसंख्यांक समाजाचे इतर समाजाबरोबर सौदार्हाचे वातावरण निर्माण करण्याबाबत | महसूल विभाग, जिल्हा | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | प्रयत्न करावे. | परिषद, पोलीस विभाग. | |
| १०. | अल्पसंख्यांक समाजातील तरुणांना पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण देण्याबाबत. | अल्पसंख्यांक समाजातील तरुणांना अल्पसंख्यांक विकास विभागाकडून पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण दिले जाते. तथापि, त्यांना लेखी परिक्षेबाबत तसेच मराठी भाषेबाबत प्रशिक्षण देणे जास्त गरजेचे आहे. त्याअनुषंगाने अल्पसंख्यांक विकास विभागाने तातडीने कार्यवाही करावी. | अल्पसंख्यांक विकास विभाग. | १ महिना |
| ११. | De-radicalisation of youths and preserving communal amity | अल्पसंख्यांक समाजातील तरुणांचे उदात्तीकरण टाळण्यासाठी त्यांना त्याबाबतचे धोके समजावून त्यांच्यामध्ये जनजागृती करण्याबाबत अल्पसंख्यांक विकास विभागाने प्रभावी कार्यक्रम हाती घ्यावा. | अपर मुख्य सचिव (गृह), प्रधान सचिव, अल्पसंख्यांक विकास विभाग, प्रधान सचिव, उच्च शिक्षण, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुबई. | १ महिना |
| १२. | केंद्र शासनाच्या योजना प्रभावीपणे राबविणे. | पंतप्रधानांचा १५ कलमी कार्यक्रम तसेच केंद्र शासनाने अल्पसंख्यांक विकासासाठी सुरु केलेल्या सर्व योजनांची राज्यामध्ये प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात यावी. | नगर विकास विभाग, ग्राम विकास विभाग, अल्पसंख्यां | १ महिना |